


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - १७० ■ शनिवार दि.८ मार्च २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 170 ■ Saturday Dt. 8 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# सतीश भोसले उर्फ खोक्या आ. सुरेश धसांना मटणाचा डबा घेऊन जायचा





■ टीपी मुंडेंचा गंभीर आरोप ■ आ. सुरेश धसांना सहआरोपी करा; उद्या शिरूर मध्ये मोर्चा
■ खोक्या भाईच्या घरी वन अधिकाऱ्यांची घरात धाड ■ हरणासह वन्य प्राण्यांचे आढळले मांस, गांजा सांगडे ■ खोक्याला पोसून बोका कोणी केले ?; सतीश भोसलेच्या मोबाईलचे सीडीआर तपासा
■ पोलीस, वनविभागाची संयुक्तरित्या धडाकेबाज कारवाई; घरामध्ये आढळला तिक्ष्ण हत्यारांचा साठा



बीड । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील सतीश उर्फ खोक्या भोसले याच्या मुसक्या आवळण्यासाठी वन विभागाने हालचाली सुरू केलया आहेत. वन अधिकाऱ्यांनी आज खोक्या भाईच्या घरी धाड टाकलून झाडाझडती घेतली. सतीश उर्फ खोक्या भोसलेच्या घरी वन्य प्राण्यांचे मांस आढळून आले. त्याशिवाय जाळ्या अन् गांजाही आढळला आहे. हरीण, काळवीट आणि मोर पकडण्यासाठी लावण्यात येणाऱ्या जाळ्या देखील वन विभागाला मिळाल्या आहेत.

शिरूर तालुक्यातील बावी येथील अमानुष मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या सतीश भोसले याचे नवीन कारनामे समोर येत आहेत. सतीश भोसले याने अनेक वन प्राण्यांचा जीव घेतला आहे. त्याच्या मुसक्या आवळ्यासाठी वन विभागाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. सतीश उर्फ खोक्या भोसले याच्या शिरूर येथील घराचे आज वनविभागाने पोलिसांच्या विभागाकडून झडती घेण्यात आली.

खोक्याच्या घरी काय काय सापडले?

वन विभागाने घेतलेल्या झडतीमध्ये सतीश भोसले याच्या घरी वन्य प्राणी पकडण्यासाठी वाघूर चित्र पकडण्याचे जाळे, एक सतुर, एक सुरी, एक जर्मनचा डब्बा या डब्यामध्ये चरबी आढळून आली आहे दोन पुड्या गांजा आढळून आला आहे. ४०० ते ५०० ग्राम गांजा असेल पुडी आढळली आहे. घरात वाळलेले मांस आढळून आले आहे. ही कार्यवाही वनविभागाने केली आहे.

ही कार्यवाही विभागीय व अधिकारी अमोल गरकळ, वन परिक्षेत्राधिकारी श्रीकांत काळे, पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश धोक्रड, आष्टी वनपरिक्षेत्र विभागाचा संपूर्ण कर्मचाऱ्यांचा स्टाफ ते पथक सर्व स्टाफ त्यासोबत वन्य प्राणी मित्र सिद्धार्थ सोनवणे उपस्थित होते. भोसले याच्या मुसक्या आवळण्यासाठी आता हे संपूर्ण मांस फॉरेन्सिक लॅबला पाठवण्यात येणार आहे. तर उद्याच्याला नऊ मार्च रोजी सुरेश धस यांना सह आरोपी करा यासाठी मोर्चा निघणार असल्याची चर्चा आता नागरिकांमध्ये होत आहे त्यामुळे आता सुरेश धस अडचणीत सापडतील का याकडे अख्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेला आहे धनंजय मुंडे सुरेश धस यांचा वाद विक्रोपाला गेल्यानंतर आता बीड जिल्ह्यातील राजकारण आणखीन तापलेलच पाहायला मिळणार आहे खोकल्यामुळे सुरेश धस अडचणीत सापडल्यामुळे सुरेश धस आता पुढील पाऊल काय टाकतात याकडे जिल्ह्याचे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.



# इंजिनीयर विशाल लांडे यांनी घरकुलाचे नियम वेशीला टांगले का?

## घरे न बांधताच लाखो रुपये बोगस लाभार्थ्यांच्या खात्यावर

■ बोगस लाभार्थ्याला टाकलेली रक्कम इंजिनियर लांडे यांच्याकडून वसूल होणार का? का उपोषण करावा लागणार का?

■ गट विकास अधिकारी यांच्याकडे तक्रार असताना टक्केवारीने हप्ते सुटले का?

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई पंचायत समितीचा कारभार कागदी घोडे नाचवण्यात दिसून येत असून गोरगरिबाच्या जनता कामासाठी १०० हेलफाते मारताना तर दुसरीकडे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान आवास योजना, तसेच मोदी आवास योजना ही गोरगरिबाच्या हक्काच्या घरासाठी शेवटच्या माणसापर्यंत ही योजना देण्याचे टार्गेट असून या योजनेचा शासकीय बाबूंनी नियम वेशीला टागले इंजीनियर विशाल लांडे सारख्या अधिकाऱ्यांनी टक्केवारी घेऊन घर न बांधतात बोगस लाभार्थ्यांच्या खात्यावर लाखो रुपये सोडण्याचा प्रकार ऑनलाइन द्वारे उघडतील आला असून अशी तक्रार दिली असताना देखील गेवराईच्या गट विकास अधिकारी कांबळे मॅडम यांनीही कसल्याच प्रकारे खातर जमा न करता पुन्हा पैसे सोडण्याचा प्रकार उघडकीस आला असून जिल्हाधिकारी पाठक साहेब यांनी स्वतः लक्ष देऊन इंजिनीयर लांडे करून बोगस सोडण्यात आलेले हप्ते त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी नसता तक्रारदार उपोषणास बसण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे




याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा हे गाव इंजिनियर विशाल लांडे यांच्याकडे असून शासनाकडून तलवाडा गावांमध्ये पाचशे सहाशे पंतप्रधान आवास योजना मोदी आवास योजना या दोन्ही घरकुल योजनेची एवढे टार्गेट आली असून यामध्ये काही जणांना पंधरा हजार रुपये ॲडव्हान्स हप्ता सोडण्यात आला असून तर दुसरा हप्ता घराचे बांधकाम कुठपर्यंत आले हे पाहून इंजिनियर मार्फत पुढील प्रक्रिया होते त्यानंतरच पुढील हफ्ते सोडण्यात येते मात्र इंजिनिअर विशाल लांडे यांनी तसे न करता बोगस लाभार्थ्यांना टक्केवारी घेऊन ज्यांना पी टि आर नसतांना त्यांना हफ्ते सोडले एवढेच नाही तर साधा पाया कोणी खदला नाही अशा ना तर चक्क सतर हजार रूपये सोडले. शासनाने त्यांची नियुक्ती नियमात कामे करण्या साठी करण्यात आली असून मात्र या ठिकाणी त्यानी नियम वेशीला टागले असून त्यासाठी तात्काळ हि बाब ऑनलाईन ही माहिती उघडकीस आली असुन गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांच्याकडे तक्रारी ही दाखल केली होती त्यानी मात्र कसल्याच प्रकारची करवाई न करता इंजिनीयर लांडे यांना बळ देण्याचे काम केले असून त्यानंतर त्यांनी चक्क पनास ते साठ लोकांना बोगस हफ्ते सोडले आहे त्यामुळे गेवराई पंचायत समिती मदे कामाचा गट विकास अधिकारी नेमण्यात यावा अशी चर्चा तालुक्यात होत आहे तर दुसरीकडे लांडे यांनी असे किती गावाचे बोगस हफ्ते काढले? याची ही चौकशी करण्यात यावी कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब विशाल लांडे यांच्या वर काय करवाई करतात या कडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जालना येथे आयेशाखान मुलानी यांच्यातर्फे महिला दिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष यांच्या संपर्क कार्यालयात आज दिनांक ८ मार्च २०२५ रोजी महिला दिवस साजरा करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला मल्हार पण करून दीप प्रज्वलन करून सुरुवात केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाच्या प्रदेश कार्याध्यक्ष आयशा खान मुलानी तर प्रमुख अतिथी म्हणून सौ अलकाबाई संत इंदेवाडी च्या सदस्य सौ उर्मिला सूमीत वाघमारे, विद्याताई गवई, ज्योतिताई म्हस्के, माजी सदस्य विमल ताई पंडित, रगडे रेखाताई गंगातीवरे या उपस्थित होत्या. आलेल्या सर्व अतिथींचा यथोचित सत्कार करण्यात आला तदनंतर ज्योती मस्के विमलताई रगडे रेखाताई गंगातीवरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अलकाबाई संत यांनी एक कविता सादर केली उपस्थित महिलांनी लक्ष्मीकांत नगर येथील रस्ते लाईट पाणी या समस्येविषयी आपल्या घरच्या सांगितल्या.

आपल्या अध्यक्षीय भाषणात आयेशा खान मुलानी म्हणाल्या की, आजचा महिला दिवस हा खऱ्या अर्थाने महिला जागृती दिवस म्हणावा असा साजरा झाला आहे.



लक्ष्मीकांत नगर प्रभागात राहणाऱ्या महिलांनी आयेशा खान यांच्या प्रेरणादायी भाषानाने लक्ष्मीकांत नगर संघर्ष समिती स्थापन करण्याचा निर्णय एकमुखाने घेतला. गत वीस पंचवीस वर्षापासून या प्रभागात विकास काम झालेले नाहीत. त्यामुळे येथील नागरिक त्रस्त आहेत व लवकरच संघर्ष समिती विद्यमान आमदार साहेबांशी चर्चा करून येथील समस्या सोडवण्याचा प्रयत्न करूत असा निर्णय घेण्यात आला.

या कार्यक्रमात आलेल्या सर्व महिलांचे आभार रुक्मिणी ताई जाधव व शिंदे ताई यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन गौरव संत बाळू वर्मा व श्री कुलकर्णी यांनी केले. सर्व उपस्थित महिलांनी कार्यक्रमाच्या आयोजिका आयेशा खान मुलानी यांचे ज्योती नवले, आरती साळुंखे, रुक्मिणी जाधव, तुळसा शिंदे, तुळजा शिंदे, सुनीता ढेकाळे, छायाबाई बोकन, तारा जयस्वाल, रेणुका संत, रंजना डोईफोडे, अलकाबाई लक्ष्मी दांडगे, कुलकर्णी ताई, रोहिणी ताई, शिंदे ताई, ज्योती बाहेगवानकर सह अनेक महिलांनी मनापासून आभार मानले.



आज दिनांक ०८.०३.२०२५ रोजी मिल्लिया आर्टस्, सायन्स, मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड़ च्या वतीने जागतिक महिला दिवसा निमित्त उत्कृष्ट विद्यार्थी (STUDENT OF THE YE-R) म्हणून सय्यद ईफराह सय्यद अखिल बी. एस. सी. तृतीय वर्ष हिस नावाजण्यात आले आहे. त्यावेळी डॉ. सीमा मिस, प्रा. हनीफ सर, प्रा. आसिफ सर, प्रा. हुसैनी सर, ड. शाहजेब बीड़ उपस्थित होते.

## साद सादिक इनामदारचा पहिला रोजा पूर्ण

धारूर । प्रतिनिधी

साद इनामदार यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला रखरखत्या उन्हात रमजान बद्दल प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर दिवसभरात अन्नाचा एकही कन ना खाता व पाण्याचा घोट न पिता जवळपास दिवसाचे १३ तास उपाशी राहून ७ वर्षीय साद इनामदार यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केल्याने नातेवाईक व मित्रपरिवार यांनी शुभेच्छा दिल्या.



# जागतिक महिला दिन : एक उत्सव, एक संघर्ष!

**जागतिक महिला दिन, जो ८ मार्च रोजी साजरा केला जातो, हा दिवस महिलांच्या कष्टाची, बलिदानाची, संघर्षाची आणि त्याच्या अभूतपूर्व यशाची ओळख म्हणून महत्त्वाचा ठरतो. या दिवशी, संपूर्ण जगभर महिलांचे योगदान आणि त्यांच्या समोर असलेल्या विविध आव्हानांची दखल घेतली जाते. महिला केवळ घरातील कामकाजासाठीच नाही, तर समाज, शिक्षण, विज्ञान, कला, तंत्रज्ञान, उद्योग आणि विविध इतर क्षेत्रांत देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. वर्षानुवर्षे महिलांना त्यांच्या हक्कांसाठी लढावे लागले. त्यांनी समाजातील प्रचलित रूढी, भेदभाव आणि अत्याचारांविरुद्ध आवाज उठवला. महिलांच्या हक्कांसाठी लढलेल्या इतिहासाच्या पिढ्यांपासून ते आजपर्यंत विविध सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण बदल घडवले गेले आहेत. या दिवशी, आपण महिलांच्या संघर्षाला मान देत, त्यांना अधिक सन्मान आणि न्यायपूर्ण अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायला हवे. महिलांना शिक्षणाच्या क्षेत्रात, व्यवसायात आणि समाजाच्या विविध अंगांत अधिक संधी मिळाव्यात यासाठी सरकार आणि नागरिक दोघांनीही एकत्र येऊन कार्य केले पाहिजे.**

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

महिला दिन केवळ एक उत्सव नाही, तर तो एक गंभीर जागरूकतेचा दिवस आहे. महिलांच्या योगदानाला सलाम देताना, आपण त्यांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि शारीरिक आरोग्याच्या संदर्भातील समस्यांवर विचार करणे आवश्यक आहे. प्रत्येक महिला, तिच्या कामामुळे आणि कष्टामुळे, समाजाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत असते. सर्वात महत्वाचे म्हणजे, जागतिक महिला दिन हा एक संकल्प दिवस असावा. हा दिवस महिलांच्या समानतेसाठी, त्यांच्या सशक्तीकरणासाठी आणि सर्व स्तरांवरील महिलांच्या हक्कांसाठी जागरूकता वाढवण्याची एक संधी असावी. यामुळे महिलांचा आवाज आणखी दृढ होईल, आणि समाजात त्यांना सन्मानाने आणि समानतेने वावरता येईल .

महिलांच्या संघर्षाची कहाणी : महिलांनी गेल्या शंभर वर्षांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये मोठे कार्य केले आहे. राजकारण, विज्ञान, कला, साहित्य, क्रीडा आणि अनेक अन्य क्षेत्रांमध्ये त्यांनी आपला ठसा निर्माण केला आहे. भारतीय महिलांची उदाहरणे घेतली तरी, इंदिरा गांधी, सरोजिनी नायडू, मीराबाई चानू, कल्पना चावला यांसारख्या दिग्गज महिलांनी आपल्या कष्ट आणि संघर्षाने इतिहास रचला आहे.

समाजाच्या बदलत्या गरजा : आजकाल महिला शिक्षण, रोजगार, आरोग्य, समजातील हिंसा विरुद्ध लढा अशा अनेक बाबींमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. 'महिला सक्षम झाली तर समाज सक्षम होतो' हा संदेश आता एक आदर्श बनला आहे. महिलांच्या मागणीसाठी तसेच त्यांच्या हक्कांसाठी होणारे संघर्ष समाजाच्या प्रगतीत महत्वाची भूमिका बजावतात.

महिला दिन साजरा करणे : जागतिक महिला दिन साजरा करताना आपल्याला महिलांच्या कार्याची कदर करण्याबरोबरच, त्यांच्या समतुल्य संधीची आवश्यकता देखील लक्षात ठेवावी लागेल. हा दिवस महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने एक प्रेरणा देणारा असावा, ज्यामुळे महिलांना त्यांच्या स्वप्नांनुसार जगण्याची संधी मिळेल. महिलांना समानता आणि सन्मान मिळाल्यास, समाजाचा प्रगतीचा मार्ग अधिक सुकर होईल.

महिला दिनाचा इतिहास : जागतिक महिला दिनाच्या सुरुवातीची गोष्ट ८ मार्च १९०८ ला न्यूयॉर्क शहरात घडली. त्यावेळी १५ हजार महिला कामाच्या ठिकाणी सुधारणा, मतदान हक्क आणि चांगल्या कामकाजी परिस्थितीच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरल्या. त्यांना विरोध करण्यात आला, पण त्यानंतर या आंदोलकांच्या आवाजाचा प्रभाव वाढला.

दुसऱ्या महिला काँग्रेसमध्ये जर्मनीतील क्लारा झेटकिन यांच्या नेतृत्वाखाली एका जागतिक महिला दिनाच्या स्थापनेसाठी ठराव मांडला गेला. त्याच वर्षी, १९११ मध्ये पहिला जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला होता, जरी तो विविध देशांमध्ये विविध तारखांना साजरा केला गेला. १९७७ साली संयुक्त राष्ट्रसंघाने ८ मार्चला जागतिक महिला दिन म्हणून घोषित केले, आणि त्यानंतर हा दिवस जागतिक स्तरावर साजरा केला जायला लागला.

महिला दिन कसा साजरा होतो : आजच्या काळात ८ मार्च हा दिवस महिलांच्या प्रेरणादायक कार्यांचे आणि त्यांच्या सशक्ततेचे प्रतीक बनला आहे. जगभरातील प्रत्येक देशात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, उपक्रम आणि रॅली यांचे आयोजन केले जाते. काही ठिकाणी महिलांना सन्मानित करून, त्यांचे कार्य गौरवले जाते. शिक्षण, विज्ञान, क्रीडा, कला, राजकारण अशा विविध क्षेत्रांमध्ये महिलांची विशेष कामगिरी दाखवली जाते. तसच, हा दिवस महिलांच्या अधिकारांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी सुद्धा महत्वाचा ठरतो. महिलांवरील हिंसा, लैंगिक शोषण, समान वेतन इत्यादी मुद्द्यांवर अधिक चर्चा केली जाते.

संपूर्ण अमेरिका आणि युरोपसहित जवळजवळ संपूर्ण जगभरातील स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. या अन्यायाविरुद्ध स्त्रिया आपापल्या परीने संघर्ष करीत होत्या.१८९० मध्ये अमेरिकेत मतदानाच्या हक्कासंदर्भात ऋद नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोसिएशन' स्थापन झाली.

१९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री–कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा 'जागतिक महिला–दिन' म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो पास झाला.

काळाच्या ओघात केवळ 'चूल आणि मूल' एवढीच मर्यादित कामे न करता स्त्रियांनी या चाकोरीतून मुक्त झाले पाहिजे असा उदारमतवादी विचार समाजाने स्वीकारला असला तरी देखील लौकिक अर्थाने स्त्रियांवरच्या जबाबदाऱ्या आणि सामाजिक बंधने अजून तशीच आहेत. या वर्षी हा दिवस 'ॲक्सलरेट ॲक्शन' या थीमखाली साजरा केला जाईल. २०२५ ची ही थीम तरुण महिला आणि मुलींना बदलाचे प्रतिनिधी म्हणून सक्षम करण्यावर आणि हवामान न्याय आणि डिजिटल समावेश यासारख्या नवीन आव्हानांना प्रतिसाद देण्यावर भर देण्यात आलेली आहे.




वानगीदाखल दिली जाणारी गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा आणि उभयभारती अशी काही उदाहरणे वगळता प्राचीन काळात देखील स्त्रियांच्या चरित्र गौरवाची फारशी उदाहरणे आपल्याला आढळत नाहीत . भारतीय समाज आणि भारतीय संस्कृती आणि त्यातील व्यवस्थेचा डोलारा सांभाळणारी व त्यासाठी सतत कार्यरत असणारी स्त्री ही हिंदू स्त्रीची साधारण प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी राहते.

ग्रामीण महिला आणि स्वातंत्र्य : ग्रामीण स्त्रियांना संधी आणि स्वातंत्र्याचा अभाव, मर्यादित संसाधने यांचा सामना करावा लागतो. याशिवाय चालीरीतींच्या ओझ्याखाली ग्रामीण जीवनाचा गाडा ओढत त्यांना संसार करावा लागतो. ग्रामीण भागात स्त्रियांचे मनुष्यबळातील प्रमाण केवळ २१ टक्के एवढेच आहे आणि या वास्तवाला अनेक घटक कारणीभूत ठरतात. परिणामी अर्ध्याहून अधिक स्त्रिया या मुख्य प्रवाहात न समाविष्ट होता दुर्लक्षित राहतात. परिणामी आपल्या देशाची उत्पादक शक्ती वाया जाते आणि अपिरिमित हानी होते.

बदलाच्या शोधातली ग्रामीण स्त्री : ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न आज सुटले आहेत असे नाही, पण पूर्वीपेक्षा परिस्थितीत किती तरी बदल होत आहेत. ताठ मानेन जगू पाहणाऱ्या या स्त्रीला आधार देण आणि शहर व गावातील स्त्री जीवनातील दरी कमी करणं ही आज काळाची गरज आहे.

महिला चळवळीच्या कार्याचा आढावा घेताना एक गोष्ट जाणवते की, जे काही संघर्ष आणि लढे झाले ते प्रामुख्याने शहरी स्त्रियांच्या प्रश्नांशी निगडित होते आणि कार्यकर्त्या प्रामुख्याने शहरी भागात राहणाऱ्या मध्यमवर्गीय पांढरपेशा स्त्रिया होत्या. परित्यक्तांचे प्रश्न, हुंडाबळी, कुटुंबातील अत्याचार हे प्रश्न शहर आणि ग्रामीण भागात सारखेच जटिल आहेत. पण त्याही पुढे जाऊन ग्रामीण स्त्रीचे काही जीवनावश्यक प्रश्न आहेत. त्याचा अधूनमधून काही महिला चळवळींनी विचार केला तरी थेट गाभ्यालाच भिडण्याचे कार्य झाले नाही आणि शहरी चळवळींशी ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नांचा सांधा फारसा जुळला गेला नाही. शहरी स्त्रियांपेक्षा ग्रामीण स्त्रीच आयुष्य अधिक शारीरिक कष्टाचं आहे. घरकाम, स्वच्छता, स्वयंपाक ही तर नेहमीची कामे आहेतच. पाणी भरणे हे तर प्रामुख्याने बाईचे काम. उन्हाळ्याच्या दिवसात खोल गेलेल्या विहिरीच्या कडेकपाऱ्यांवर उभ्या राहिलेल्या मुली, तरुण स्त्रिया, वृद्धा जेव्हा पाणी भरण्यासाठी हंडे, कळशा घेऊन चार–पाच मैलांची पायपीट पाण्यासाठी करताना वृत्तपत्रांतील फोटोत दिसतात, तेव्हा आपल्यालाच घरातला नळ सोडल्यावर हवे तितके पाणी वापरण्याच्या आपल्या वृत्तीची लाज वाटते. कष्ट आणि वेळ दोन्ही इतक्या मोठ्या प्रमाणात खर्च होऊनही राग आणि कडवटपणाचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नाही. स्वत:ची शेती असेल तर शेतकरी स्त्रीला शेतावरची कष्टाची कामे नेहमीच करावी लागतात. शिवाय कुक्कुटपालन, दूधदुभत्याची व्यवस्था ही कामे बहुधा बायकांची असतात. शेतमजूर म्हणून दुसऱ्यांच्या शेतावर राबणाऱ्या स्त्रियांनाही पुरुषांपेक्षा कमी मजुरी मिळते आणि आर्थिक शोषणालाही तोंड द्यावे लागते. गरीब घरातून मुलीचे शिक्षणही लवकरच थांबते आणि अल्पवयात बाळंतपणे, कुपोषण, अनारोग्य यांच्याशी त्यांना सामना करायला लावणे याही गोष्टी सर्वसामान्य आहेत. काळाच्या ओघात ही परिस्थिती बदलण्याचे अनेक प्रयत्न झाले. त्यात ग्रामीण स्त्रियांचाही सिंहाचा वाटा आहे. यातल्या काही प्रयत्नांचा मागोवा घेतला तर होणारे आशादायक बदल दिसून येतील.

ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न आज सुटले आहेत असे नाही, पण पूर्वीपेक्षा परिस्थितीत किती तरी बदल होत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या तुलनेत शेतकरी स्त्रियांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी आहे. त्यामागच्या अनेक कारणांत परिस्थितीशी चिवटपणे झुंजण्याचे स्त्रीचे सामर्थ्य आहे. गरिबातल्या गरीब घरातील मुलीही आज शिक्षणासाठी घरापासून दूर राहून शिक्षण घेण्याच्या खटपटीत दिसतात. अल्पवयातील लग्नाचे प्रमाणही तुलनेने कमी झाले आहे. ताठ मानेनं जगू पाहणाऱ्या या स्त्रीला आधार देणं आणि शहर व गावातील स्त्री जीवनातील दरी कमी करण ही आज काळाची गरज आहे.

महिला दिनानिमित्त भारतातील या प्रभावी महिलांचा परिचय असलाच पाहिजे :

राजमाता जिजाबाई शहाजी भोसले : ह्या मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होत्या. त्यांना राजमाता, राष्ट्रमाता, जिजाबाई किंवा जिजाऊ म्हणून संबोधले जाते.

राणी लक्ष्मीबाई : शौर्य, देशभक्ती आणि राष्ट्रवादाचे प्रतीक. राणी लक्ष्मीबाईंच्या अटल वचनबद्धतेमुळे त्या भारतीय इतिहासात प्रेरणा आणि शक्तीचे प्रतीक बनल्या आहेत.

सावित्रीबाई फुले : या भारतातील एक अग्रणी समाजसुधारक होत्या, विशेषतः १९ व्या शतकात महिला शिक्षणात त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेसाठी ओळखल्या जातात. १८४८ मध्ये त्यांनी आणि त्यांचे पती, ज्योतिराव फुले यांनी पुण्यातील पहिली मुलींची शाळा स्थापन करून सामाजिक परंपरा मोडल्या. सावित्रीबाईंनी महिलांसाठी शिक्षणाचा प्रचार करण्यासाठी, त्यांच्या हक्कांसाठी वकिली करण्यासाठी आणि भेदभावाला आव्हान देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले.

विजयालक्ष्मी पंडीत : त्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या पहिल्या भारतीय आणि जगातील पहिल्या महिला अध्यक्ष होत्या.

अहिल्याबाई होळकर : यांचा जन्म चोंडी येथे झाला. त्या १८ व्या शतकातील मालव्यातील प्रमुख राणी होत्या. त्या त्यांच्या सर्जनशील शासन आणि सार्वजनिक कल्याणासाठी समर्पणासाठी प्रसिद्ध होत्या.

सरोजिनी नायडू : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख व्यक्तिमत्व, त्यांनी स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९२५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा होणाऱ्या पहिल्या भारतीय महिला म्हणून, त्यांनी निर्भयपणे राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी पुढाकार घेतला.

किरण बेदी : भारतीय पोलिस सेवेतील एक अग्रणी म्हणून जन्मलेल्या किरण बेदी यांनी अधिकारी पदावर रुजू होणाऱ्या पहिल्या महिला म्हणून इतिहास रचला. पोलिस सेवेतील सुधारणांमध्ये अग्रेसर आणि तुरुंग सुधारणांमध्ये प्रभावी बदल घडवून आणणे हे त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचे वैशिष्ट्य आहे. बेदी यांच्या नियुक्तीमुळे पोलिसिंगमध्ये एक परिवर्तन घडले, कार्यक्षमता आणि जबाबदारी वाढली.

बेगम हजरत महल : अवधचे शासक नवाब वाजिद अली शाह यांच्या पत्नी बेगम यांनी ब्रिटीशांकडून कोणतेही उपकार किंवा भत्ते स्वीकारण्यास नकार दिला. बेगम यांनी त्यांचा सेनापती राजा जैलाल सिंग यांच्या मदतीने ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीशी शौर्याने लढा दिला.

मदर तेरेसा : यांचा वारसा त्यांच्या आयुष्याच्या पलीकडे पसरला आहे, त्यांच्या अथक सेवेमुळे त्यांना १९७९ मध्ये नोबेल शांतता पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले. मिशनरीज ऑफ चॅरिटीद्वारे त्यांचे ध्येय व सेवा चालते.

जागतिक महिला दिन हा केवळ महिलांचा सन्मान करण्याचा दिवस नाही, तर त्यांना समाजात समान अधिकार मिळवून देण्याचा दिवस आहे. या दिवसाच्या माध्यमातून आपण महिलांच्या कार्याची कदर करायला हवी आणि त्या क्षेत्रात अधिक प्रगती साधण्यासाठी त्यांना योग्य संधी देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. एकत्र येऊन, प्रत्येक व्यक्तीला समान हक्क देणारा समाज निर्माण करणे हेच महिला दिनाचे खरे महत्व आहे.

उंबरा ओलांडून घराला
मंदिर बनवणारी लक्ष्मी आहे ती
संसाराचा गाडा चालवणारी
देव्हाऱ्यातील माऊली आहे ती
अशी माऊली तुझ्याविणा व्यर्थ सारं काही
महिला दिनाच्या शुभेच्छा !

# पाझर तलावासाठी संपादीत जमिनीवर पवनचक्कीचे उपकेंद्र कारवाईस टाळाटाळ

## मावेजा मागणाऱ्या शेतकऱ्यांला दिवसभर पोलिसांनी डांबून ठेवले; बेनसुर येथील प्रकार

पाटोदा । प्रतिनिधी

**पाटोदा तालुक्यातील धनगरजवळका येथे पाझर तलाव क्रमांक ७ साठी सर्व्हे गट नंबर ८ मधील संपादीत केलेल्या जमिनीवर पवनचक्की द्वारे निर्मित वीजेसाठी जवळपास ५ कोटी रुपये खर्चून सरकारी जमिनीवर २२० केव्ही चे उपकेंद्र रेन्यु पावर कंपनीने बांधण्यात आले आहे. प्रशासकीय आणि राजकीय हस्तक्षेपामुळे या फसवणूक प्रकरणी कारवाई करण्यास पोलिस प्रशासन टाळाटाळ करत आहे. मात्र याचवेळी दुसरीकडे पाटोदा तालुक्यातील बेनसुर येथील शेतकरी बापु बंकट आर्सुळ आणि मयुर भाऊसाहेब झोडगे यांनी त्यांच्या गट क्रमांक ४५ मधील शेताचा मोबदला न देताच शेतातुन तार ओढण्याचे काम करणाऱ्या कंपनीला काम करू नका अशी विनंती करताच पवनचक्की कंपनीच्या सांगण्यावरून पाटोदा पोलिस प्रशासनाचा ताफा घटनास्थळी दाखल झाला आणि शेतकऱ्यांचे काही प्रश्न आहेत का?**




संबंधित शेतकऱ्याला कंपनीने मोबदला दिला आहे का याची खातरजमा न करताच दमदाटी करत पोलिस गाडीत घालून पाटोदा पोलिस ठाण्यात दिवसभर डांबुन ठेवले आणि रात्री पोलिस संरक्षणात काम सुरुच होते. यामुळे एकंदरीतच मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पवन ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणी कामांना पोलिस संरक्षण दिले जात असताना संबंधित शेतकऱ्याचे ना हरकत अथवा करार किंवा कायदेशीर दस्तावेज कंपनीकडे आहेत का? शेतकऱ्याला मोबदला मिळाला आहे का? शेतकऱ्यांच्या काही अडचणी आहेत का?? याची शहानिशा न करताच पोलिस बळावर शेतकऱ्यांवर अन्याय होत असुन शेतकऱ्यांना वाली कोण? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

### पोलिस प्रशासनाला हाताशी धरून पवनचक्की कंपन्यांची मोगलाई सुरू : बाळासाहेब मोरे पाटील

पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी पवनचक्की कंपन्यांच्या आधिकाऱ्यांकडून पोलिस प्रशासनाला हाताशी धरुन मोगलाई सुरू असुन दडपशाहीचा अवलंब करत असुन अशिक्षित अडाणी शेतकऱ्यांची दिशाभूल करत कायद्याची भिती दाखवून शेतकऱ्यांवर अन्याय सुरू आहे. पाटोदा पोलिस स्टेशनच्या आधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना मोबदला दिला नसताना कोणतीही शहानिशा न करता विचारलेल्या प्रश्नांना उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाही आणि पोलिस प्रशासनाच्या मनमानी कारभार विरोधात जन आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे बाळासाहेब मोरे पाटील प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच यांनी सांगितले.

### पत्रकाराला वार्तांकन करण्यास मज्जाव; पोलिसांची भुमिका संशयास्पद : मुस्तफा पठाण

पोलिस प्रशासनाने पवनचक्की कंपन्यांना संरक्षण देऊ नये अशी भुमिका कोणीच घेणार नाही. मातृर पोलिस प्रशासनाने पवनचक्की कंपन्यांकडून उचल घेतल्यागत पवनचक्की कंपनीचे हस्तक असल्यासारखे वागु नये. शेतकऱ्यांना मोबादला न देताच काम पूर्ण करण्यासाठी पोलिस प्रशासनाकडुन सहकार्य होत असेल तर शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला कोण संरक्षण देणार? मी स्वतः पत्रकार असुन माझे ओळखपत्र दाखवून सुद्धा पोलिसांनी वार्तांकन करण्यास मज्जाव केला. पत्रकारांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न असुन संबंधित प्रकरणात पोलिस अधीक्षक बीड नवनित कांवत यांची भेट घेऊन तक्रार करणार असल्याचे पत्रकार तथा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ सक्रिय प्रचारक बीड तालुका मुस्तफा पठाण यांनी सांगितले.

## पेठ बीड सार्वजनिक जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर

बीड । प्रतिनिधी

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती गेल्या पंधरा वर्षांपासून पेठ बीड भागात विशेष उत्साहाने साजरी केली जाते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक प्रदेश अध्यक्ष पप्पूजी कागदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली, या जयंती उत्सवाचे संस्थापक अध्यक्ष अक्षय कोकाटे यांच्या संकल्पनेतून यावर्षीची कार्यकारणी घोषित करण्यात आली आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध आकर्षक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांमध्ये प्रबोधन व्याख्यान, सांस्कृतिक संगीत रजनी, शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, तसेच भव्य मिरवणूक यांचा समावेश असणार आहे.





या उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी नवीन उत्सव कार्यकारणीची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये अध्यक्षपदी विशाल चांदणे, उपाध्यक्ष पदी राहुल कोकाटे, कोषाध्यक्ष कपिल ढाकणे, सचिव तुषार ईनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इतर सदस्यांमध्ये योगेश गायकवाड, आकाश कोरडे, सोनु शिंदे, बबलू वाघमारे, सागर धन्वे, शुभम कोकाटे, तुषार मौरे, आणि अभिजित कोकाटे यांचा समावेश आहे. या सन्माननीय कार्यकारणीच्या निवडीनंतर, जयंती उत्सवाचे आयोजन करण्यासाठी अधिराज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जाईल, जेणेकरून महात्मा फुले यांचे विचार आणि कार्य जनसंपर्कांत आणता येईल.

## जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र पत्रकार संघाचा अनोखा उपक्रम

### जागतिक महिला दिनानिमित्त केज तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सपत्नीक सत्कार समारंभ व स्नेह भोजन कार्यक्रमाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

सर्व पत्रकार बांधवांचे सपत्नीक सत्कार सोहळ्याचे आयोजन आज दिनांक ८ मार्च २०२५ शनिवार रोजी हॉटेल गुरुमुख बीड रोड केज या ठिकाणी सायंकाळी ७ वाजता करण्यात येणार आहे. पत्रकार हा समजाचा जबाबदार घटक असुन तो निर्भिडपणे काम करतो. त्याचे काम अविरत चालु राहावे. त्यामधे कुठलीही बाधा येऊ नये याची सर्वतोपरी काळजी घेणारी व्यक्ती म्हणजे त्याची अर्धांगिनी होय.

आपल्या सुखः दुःखात नेहमी साथ देणाऱ्या, वेळप्रसंगी आपल्यासोबत खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या त्याच पत्नीचा मान सन्मान करण्याची जबाबदारी आपण घेतली पहिजे या उदात्त भावनेतून 'महाराष्ट्र पत्रकार संघाच्या' वतीने पत्रकारांचा सपत्नीक सत्कार सोहळा या निमित्ताने आयोजित केला असुन केज शहरांतील सर्व पत्रकार बांधवांनी या कार्यक्रमास हजेरी लावावी असे आवाहन महाराष्ट्र पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष चंद्रकांत पाटिल यांनी केले आहे. या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे संघटक संजय भोकरे, सल्लागार राजीव खांडेकर, सरचिटणीस विश्वासराव आरोटे, कार्याध्यक्ष निलेश सोमानी, उपाध्यक्ष अशोक देडे, प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, (इलेक्ट्रॉनिक व डिजिटल मीडिया), राज्य समन्वयक नितीन शिंदे, बीड जिल्हा अध्यक्ष ग्रामीण अँड. विनायक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, शाखा केजच्या वतीने जागतिक महिला दिना निमित्त केज तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचा सपत्नीक सत्कार समारंभ व स्नेहभोजन कार्यक्रम हॉटेल गुरुमुख बीड रोड केज या ठिकाणी आयोजित केला आहे.

तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ.सीताताई बनसोड नगराध्यक्षा नगरपंचायत केज, मा.श्री.बजरंग बप्पा सोनवणे, खासदार बीड लोकसभा, मा.श्री. रमेशराव आडसकर चेअरमन, अंबा साखर कारखाना मा.श्री. अंकुशराव इंगळे, सभापती कृ.उ.बा.समिती केज, मा.श्री.हारूणभाई इनामदार जनविकास परिवर्तन आघाडी प्रमुख केज, मा.श्री.राकेश गिड्डे तहसीलदार केज, मा.श्री. लक्ष्मणराव बेडसकर साहेब गटशिक्षणाधिकारी केज, मा.श्री.वैभव पाटील पोलीस निरीक्षक केज, मा.श्री.रमाकांत बापू मुंडे ज्येष्ठ नेते भाजपा मा.श्री. राहुलभैया गदळे भाजपा युवा नेते यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

तरी केज तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांना विनंती करण्यात येते की, या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, तालुका उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, सचिव विजय बिक्कड, सहसचिव आप्पाराव सारूक, कोषाध्यक्ष विवेक बनसोड, कार्याध्यक्ष नंदुलाल मिसाळ, प्रसिद्धीप्रमुख पांडुरंग कसबे, डिजिटल मीडिया अध्यक्ष स्वानंद बिक्कड, अध्यक्ष पत्रकार विरोधी हल्ला समिती विश्वास राऊत, कायदे विषयक सल्लागार अँड. सतीश मस्के यांनी केले आहे.




## धारूरमध्ये पेट्रोल व प्रदुषण विरहित इ बाईकच्या शोरूमचा शुभारंभ

धारुर । प्रतिनिधी

किल्ले धारुर येथे प्रदूषण व पेट्रोल विरहित ही बाईक शोरूम चा शुभारंभ गुरुवारी करण्यात आला. उद्घाटन प्रसंगी उद्योजक माधव निर्मळ, नगराध्यक्ष धारूर डॉ. स्वरुपसिंह हजारी यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले.

ई–बाइक मुळे पेट्रोलचा खर्च बचत होणार आहे, केवळ सात ते दहा रुपयांमध्ये ६० ते १०० किलोमीटर दुचाकी प्रवास करता येतो सेंट्रल लॉकिंग सिस्टीम, जीपीएस, म्युझिक सिस्टीम, रिमोट कंट्रोल, मोबाईल कंट्रोल अशा अनेक डव्हान्स फीचर्स या ई बाईक मध्ये असल्याने दुचाकीस्वारास दुचाकी प्रवासाचा आनंद घेता येणार आहे. धारूर येथील दिनेश मुसळे व राजेंद्र मुसळे या उद्योजकाने माजलगाव, धारूर, वडवणी व परळी या चार तालुका ठिकाणी शोरूम चालू केल्याने चारही तालुक्यातील जनतेला याचा लाभ मिळणार आहे. शेतकरी, शासकीय नोकरदार, शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी व महिलांसाठी कमी किमतीत उपलब्ध असून प्रत्येकी एका गाडीवर वीस हजार रुपयांचा डिस्काउंट दुचाकी खरेदीसाठी देण्यात आल्याचे उद्योजक मुसळे बंधूंनी सांगितले.

यावेळी उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर उद्योजक माधव निर्मळ, नगराध्यक्ष, डॉ. स्वरुपसिंह हजारी, राजमुद्रा सामाजिक संघटनेचे सुरेश शेळके, ऍड.मोहन भोसले, बाळासाहेब गायकवाड,नगरसेवक संजित कोमटवार, बाळू सोनटक्के, नाना चव्हाण, पत्रकार रोहित फावडे, नाथा चव्हान, कैलास बोरगावकर, एम.डी. मोटर्सचे संचालक दिनेश मुसळे, अक्षय अंधारे या सर्वांची उपस्थिती होती.

## संघर्षामधूनच महिलांना मतदानाचा अधिकार



स्वाती पांडुरंग कसबे
केज जि. बीड

८ मार्च हा दरवर्षी आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस साजरा करण्यामागचा हेतू काय? आज महिला या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रामध्ये काम करताना दिसून येतात, मग आजही महिला दिवस का साजरा करायचा? काही दशके मागे गेल्यानंतर आपल्या लक्षात येईल की महिलांना काय अधिकार होते? महिला आणि पुरुष यांच्यामध्ये भेदभाव होता का? महिला सशक्तीकरणासाठी किती उपाययोजना करण्यात आल्या? महिलांचे अनेक संघटन, गट–तट आपल्या अधिकारांविषयी जागृत झाले. महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. मोठ्या संघर्ष मधूनच महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एक मत एक अधिकार देऊन विचारप्रक्रियेमध्ये सर्वांना समान स्थान दिले. महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला तेव्हा महिलांच्या मतदानाचा अधिकार तोच पुरुषांच्या मतदानाचा अधिकार हा सर्वांसाठी समान लेखला गेला.

महिलांना सामाजिक विचारधारेमध्ये कुठलेही स्थान नव्हते. महिला या फक्त चूल आणि मूल इथपर्यंतच सीमित होत्या. महिलांना काम करण्याची मुभा नव्हती अशा परिस्थितीमध्ये महिलांमध्ये आपल्या अधिकारांविषयी जागरूकता निर्माण झाली आणि त्यातूनच महिला सशक्तीकरणाविषयी उपाय योजना आखण्यात आल्या सरकारद्वारे त्या संदर्भातल्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत.

आजही मुख्य प्रवाहात नसलेल्या तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या माता–भगिनींसाठी सरकारद्वारे लाडकी बहीण योजनेसारखा उपक्रम राबवला जातो व त्यातूनच महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हातभार लावला जातो. आज महिला वर्ग अनेक क्षेत्रांमध्ये नावलौकिक करताना दिसत आहे. शैक्षणिक, राजनीतिक, सामाजिक, अशा विविध क्षेत्रांमध्ये आज महत्वपूर्ण कामगिरी बजावताना दिसून येतात.

केजच्या प्रथम नागरिक म्हणून सीता ताई बनसोड या कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव आज बीड सारख्या ठिकाणी पुरस्कार रूपाने देण्यात येत आहे. डॉक्टर अंजली ताई घाडगे, संगीता ताई ठोंबरे या राजनीती मध्ये सक्रिय आहेत त्याचबरोबर रजनीताई पाटील या तर काँग्रेसच्या खासदार आहेत. शितलताई लांडगे यांच्यासारख्या महिला सामाजिक कार्याबरोबरच राजकारणामध्ये सक्रिय आहेत. अशा असंख्य महिला या आपल्या शहरांमधून विविध क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमरावताना पाहायला मिळत आहेत.

भारताला पहिला खो–खो विश्वचषक मिळवून देणारी प्रियंका इंगळे ही केज तालुक्यातील कळंबा गावची. संपूर्ण महिला वर्गाला तसेच भारतीयांना अभिमान वाटावा अशी तिची कामगिरी. परंतु दुसरीकडे महिलांचे अनेक प्रश्न अजुनही सुटलेले नाहीत. महिलांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी अजूनही प्रयत्न करण्याची गरज आहे. सार्वजनिक ठिकाणी महीला सुरक्षित नाहीत. अन्याय अत्याचार आणि घरेलु हिंसेची महीला अजुनही शिकार होताना दिसत आहे. कित्तेक महिलांना दडपशाहीची वागणूक मिळत आहे. कालची ताजीच घटना आहे की केज तहसिल कार्यालयासमोर एका महिलेला आत्मदहन करण्याची वेळ आली. पुण्यामध्ये स्वारगेट सारख्या गजबजलेल्या ठिकाणी महिलेवर अत्याचार होतो. यातून महिलांचे सामजिक प्रश्न अजुनही सुटलेले नाहीत हेच लक्षात येते. याच्यावर अधिक ताकतीने काम करण्याची गरज आहे. याकरिता विविध स्तरातून अनेक उपाय योजना करण्याची आवश्यकता दिसून येत आहे.

## पत्रकार सचिन साखरे यांना आदर्श युवा पत्रकार पुरस्काराने सन्मानित




केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे आवसगावचे भूमिपुत्र तथा परळी वार्ता चे जिल्हा प्रतिनिधी सचिन साखरे यांची दैनिक शिवजगार, विश्वनाथ फाउंडेशन यांनी महाराष्ट्र रत्न गौरवआदर्श युवा पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २८ फेब्रुवारी रोजी सवित्रीबाई फुले स्मारक, संस्कृतिक भवन गंजपेठ पुणे येथे सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, सिने दिग्दर्शक ओमकार माने, मिसेस ग्लोबल इंडिया स्मिता राठोड, उद्योजिका सुजताताई चिंता यांच्यासह इतर मान्यवराच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे संयजोक ऍड. शंकर शेषेराव चव्हाण विश्वनाथ फाउंडेशन, दैनिक शिवजगार इन्फोडाड यांनी केल आहे हे मागील अनेक वर्षा पासून सामाजिक, राजकीय, कला, संस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता, आदर्श ग्रामपंचायत, अशा अनेक क्षेत्रातील चांगले कार्य करणार्यांना पुरस्कार देऊन सन्मान करतात. त्यातील २०२५ वर्षीचा महाराष्ट्र रत्न आदर्श युवा पत्रकार पुरस्कार पत्रकार सचिन धनराज साखरे यांना मिळाल्या बदल त्याचे सर्व क्षेत्रातील हितचिंतक यांच्या अभिनंदन करण्यात येत आहे.

# चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्रासपणे गुटखा विक्री

## ■ अन्न औषध प्रशासनाची गुटख्याच्या अवैध विक्रीवर 'नजर' नाही? ■ चकलांबा पोलीसांच्या दुर्लक्षामुळे गुटख्याची विक्री जोमात? ■ पोलीस अधीक्षक कॉवत साहेब, याकडे विशेष लक्ष घालण्याची गरज?

गेवराई । प्रतिनिधी

गुटखा विक्रीला बंदी असतानाही गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटख्याची दणक्यात विक्री सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. गुटखा विक्रेत्यांना अभय दिले जात असल्याने गुटखा विक्री जोमात आणि चकलांबा पोलीस प्रशासन कोमात गेल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्याचा चार्ज घेतल्यापासून अवैध धंद्यांना पूर्णपणे ब्रेक लागला आहे. अवैध धंदे मोडीत काढण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रमुखांना कडक कारवाईचे आदेश दिले असले तरी चकलांबा पोलीसांकडून कारवाई होताना दिसत नाही. चकलांबा ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटखा व माव्याची खुलेआम विक्री सुरूच आहे.



बाहेरून रात्री-अपरात्री येणाऱ्या गाड्यांतून गुटखा चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत विक्रेत्यांना पोहच होतो. गुटख्याच्या पुड्यांच्या माळा पोत्यात खचाखच भरलेल्या असतात. गुटख्याची पोती स्थानिक विक्रेत्यांना पोहोच होत असून याकडे संबंधित चकलांबा पोलीसांकडून व अन्न व औषध प्रशासन विभागाने दुर्लक्ष होत असल्याचे स्थानिकच्या नागरिकांकडून सांगितले जात आहे. सर्रासपणे गुटखा विक्री केली जात असल्याने तरुण पिढी व्यवसनाधीनतेकडे झुकत असल्याचे चित्र दिसत आहे. आजची तरूण पिढी व्यसनामुळे उद्धस्त होत असून, पर्यायाने कुटुंबाची देखील वाताहत होत आहे. गुटख्यावर बंदी असतानाही चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्रासपणे गुटख्याची विक्री होत आहे. सर्रासपणे मोठ्या प्रमाणावर गुटख्याची विक्री करण्यात येत असल्याने अगदी सहज मिळत असलेल्या गुटख्याच्या आकर्षणामुळे तरूण पिढी गुटख्यामुळे कॅन्सरसारख्या रोगाने नाहक बळी पडत आहेत. खुलेआम विक्री होणाऱ्या गुटख्यावर चकलांबा पोलिस प्रशासन व अन्न व औषध प्रशासन विभागाने गुटखा विक्रीस कायमची बंदी घालावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### अवैध गुटखा विक्रेत्यांवर कारवाई होणे गरजेचे?

अन्न व औषध प्रशासनामार्फत गुटखा विक्रेत्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. मात्र अन्न प्रशासनाकडून कुठल्याही विक्रेत्यांवर कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. तसेच चकलांबा पोलिसांकडूनही गुटखा विक्रेत्यांवर कारवाई केल्याचे दिसून आले नाही. बेकायदा गुटख्याची विक्री सुरू असताना अन्न प्रशासन आणि पोलिस प्रशासन याकडे दुर्लक्ष का करतंय? असा प्रश्न अनेकाकडून उपस्थित केला जात आहे.




### शाळकरी मुलेही व्यसनाधीन!

गेल्या काही वर्षांत गुटख्याच्या व्यसनामुळे तोंडाचा कर्करोग होण्याचे प्रमाण वाढल्याचे डॉक्टर सांगत आहेत. त्यामुळे तंबाखू तसेच तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन न करण्यासाठी जनजागृती करण्यासाठी सरकारचे राज्य पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र, पोलिसांच्या दुर्लक्षामुळे विक्रीसाठी गुटखा सहज उपलब्ध होत आहे. गुटखा विक्रीस बंदी असूनही अनेक टपऱ्या, दुकानांत गुटख्याची पाकिटे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. शाळकरी मुले देखील गुटख्याच्या व्यसनाधीन झाले असून गुटखा विकत घेत आहेत. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये गुटख्याचे व्यसन वाढल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

### गुटख्याची उपलब्धी मुबलक

जागोजागीच्या काही टपऱ्या आणि दुकानांमध्ये मिळणाऱ्या गुटख्यामुळे गुटख्याला नक्की बंदी आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. बंदी असलेली वस्तू सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. परंतु गुटखा मुबलक प्रमाणात मिळत असल्याने बंदीबाबत शंका उपस्थित होऊ लागली आहे.



# बीड एलसीबीने पकडला १४ लाख ५० हजाराचा गुटखा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवाया करून अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्री.नवनीत सर यांनी दिल्या आहेत. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. उस्मान यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून हिवरसिंगा ता. शिरूर कासार येथील एक इसम याने महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत गुटख्याचा साठा केला असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्यांचे पथकास सुचना देवून कारवाईसाठी रवाना केले असता आज दिनांक ०८/०३/२०२५ रोजी मौजे हिवरसिंगा ता. शिरूर येथे इसम नामे बंडू निवृत्ती जाधव रा. हिवरसिंगा यांचे घरी छापा टाकला असता एकूण १४,५०,३२० रूपये किंमतीचा विमल गुटखा मिळून आला. संबंधित आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन शिरूर कासार येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक उस्मान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम, पो.हवा.अशोक, दीपक, सोमनाथ, बाळू, अर्जुन, नारायण, सिद्धेश्वर असे स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.



# भैय्याजी जोशी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा

## अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल : अशोक जाधव

केज । प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे केज तालुका प्रमुख अशोक जाधव यांनी भैय्याजी जोशी यांच्या वादग्रस्त विधाना बद्दल केज तहसीलदार यांना दि. ७ मार्च २०२५ रोजी निवेदन दिले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख सदस्य राहिलेले भैय्याजी जोशी यांनी महाराष्ट्राच्या राजभाषाविरुद्ध अपशब्द वापरले, महाराष्ट्रावर वादग्रस्त विधान केले. अशा व्यक्तीवर राजद्रोहाचा/देशद्रोहाचा गुन्हा नोंद करून या व्यक्तीला अटक करावी. अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे केज यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असे शिवसेना केज तालुका पदाधिकारी यांच्यावतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

# सिरसमार्ग उपोषणास शेतकऱ्यांचा वाढता पाठिंबा

## गावोगावचे शेतकरी घेऊ लागले सहभाग

गेवराई । प्रतिनिधी

जायकवाडीच्या पाण्यासह विविध मागण्यांसाठी गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे चार दिवसांपासून शेतकर्यांचे उपोषण सुरु आहे. या उपोषणामुळे सिंदफणा पट्ट्यात पाण्याचीच चर्चा असून गावोगावचे शेतकरी या उपोषणास दररोज भेट देऊन उपोषणात सहभागी होत आहेत.

या उपोषणात बुधवारी कमळेश्वर धानोरा, शहाजानपूर, बहाद्दरपूर, काळेवाडी, तरटेवाडी, मानकापूर, टाकळगव्हाण, कोळगाव, पोखरी, दिमाखवाडी, पारगाव येथील शेतकर्यांनी भेट देत सहभाग घेतला. यावेळी राजेसाहेब काका पवळ, सय्यद महाराज, बाबुराव जेठे, शामराव घुगे, काशीनाथ भावले, महादेव धुगे, राजाराम पवळ, रामराव पवळ, धुराजी महाराज कोळेकर, रंगनाथ पाबळे, नामदेव रडे, संतराम वलेकर, केशव लोखंडे, सखाराम शेजाळ, भाऊसाहेब जोशी, बंडू हजारे, सुशिल फरतारे, नारायण शेरकर, बाबुलाल घुगे, सुनिल शेरकर, मुजीब पठाण, उद्धव हजारे, कल्याण जेठे, महादेव उमाप, दादाराव उमाप, तुकाराम टाकसाळ, ईश्वर भांगे, मनोहर जेठे, सुभाष एरंडे, आदीनाथ जोगदंड, कचरू हाडुळे, संतोष जोशी, अब्दुल रहेमान, सय्यद समद, लहूराव जोगदंड, अनिल जोगदंड, सखाराम जोगदंड, भाऊसाहेब जोगदंड, राजेंद्र कांगडे, गणेश कोळेकर, पांडुरंग पन्हाळे, रामकिसन सागडे, भाऊराव पवळ आदी उपस्थित होते. या उपोषणास शेतकऱ्यांचा वाढता पाठिंबा असल्याने सिंदफणा पट्ट्यात सर्वत्र पाण्याचा विषय आहे. जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत शेती व उद्योगांना पाणी द्यावे, नदीजोड प्रकल्प गतीने राबवावे यासह इतर मागण्यांवर विधानसभा सभागृहात चर्चा करून निर्णय घ्यावा यासाठी आंदोलन अधिकाधिक तीव्र करण्याचा निर्धारही यावेळी शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### आरोग्य पथकाने केली तपासणी

सिरसमार्ग येथे तीन तारखेपासून शेतकऱ्यांचे उपोषण सुरु आहे. उपोषणकर्ते शेतकरी यांची बुधवारी प्राथमिक आरोग्य पथक सिरसमार्ग चे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज नवनाथ बनसोडे तसेच सबसेंटर सिरसमार्ग चे सामुदायिक आरोग्य अधिकारी डॉ.अविनाश बहिर यांच्या आरोग्य पथकाने भेट घेऊन तपासणी केली. उपोषणामुळे अशक्तपणा जाणवल्यास जठड घेण्याचा सल्लाही डॉक्टरांनी आंदोलनकर्त्यांना दिला आहे.




# भारतीय स्टेट बँकेच्या ऋण समाधान योजनेचा लाभ घ्यावा : निलेश वाडीया




धारूर । प्रतिनिधी

भारतीय स्टेट बँकेने थकबाकीदार सभासदांसाठी एक वेळ एक रकमी तडजोड योजना आर्थिक अडचणीमुळे थकित असणारे कर्जदारांच्या मदतीसाठी घोषित केली आहे ही योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे. या योजनेत सर्व पात्र खात्यामध्ये एन.पी.ऐ. तारखेपासून संचित व्याजात सुट देण्यात येणार असून परत फेडीच्या रकमेतही १५% ते ७०% भरिव सूट देण्यात येणार आहे. कायदेशीर व इतर खर्चही माफ केला जाणार आहे. मयत खातेदाराच्या कर्जफेडीत विशेष सवलत दिली जाणार असून एक रकमी परतफेड करणारे सभासदांना विशिष्ट अटीवर पुनरकर्ज दिले जाईल तरी थकबाकी दार सभासदांनी या योजनेचा लाभ घेऊन आपली पत वाढवावी असे अवाहन भारतीय स्टेट बँक शाखा धारूरचे बँक व्यवस्थापक निलेश वाडीया यांनी केले आहे.

# स्वावलंबी आणि सक्षम बनण्यासाठी महिलांनी संस्कृता बनलं पाहिजे; प्रो.डॉ.उज्वला चक्रदेव

बीड । प्रतिनिधी

एक स्त्री जेव्हा संस्कृता बनते, तेव्हा ती केवळ स्वतःसाठीच नाही, तर समाजासाठीही एक आदर्श बनते. ती स्वतःच्या कौशल्यांद्वारे समाजात बदल घडवते आणि इतर महिलांनाही प्रेरणा देते, त्यामुळे तुम्ही स्वावलंबी आणि सक्षम बनवण्यासाठी संस्कृता बनलं पाहिजे, असे प्रतिपादन एसएन डीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो.डॉ.उज्वला चक्रदेव यांनी केले. बीड शहरातील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन या महाविद्यालयाच्या नूतन इमारतीतील इंग्रजी भाषा प्रयोगशाळा तसेच विज्ञान प्रयोगशाळेचे उद्धाटन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो.डॉ.उज्वला चक्रदेव यांच्या हस्ते शनिवार ०६ मार्च रोजी संपन्न झाले, यावेळी त्या बोलत होत्या. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून एसएनडीटी महिला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा.डॉ.साईनाथ बनसोडे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रदीप रोडे होते. व्यासपीठावर देवगिरी प्रतिष्ठानच्या सचिव मा.दीपा रोडे, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनचे प्राचार्य मा. डॉ.अशोक दुलधुले आदी मान्यवर उपस्थित होते.



उद्धाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू प्रो.डॉ.उज्वला चक्रधर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सोबतच विद्यापीठाच्या विविध कल्याणकारी योजना राबण्याचे आवाहन केले, तसेच विद्यार्थिनींनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा विचार करा. तुमच्या हातात असलेल्या स्मार्टफोन आणि इंटरनेटचा वापर करून माहिती गोळा करा आणि त्या आधारे व्यवसाय पुढे न्या. लहान व्यवसायापासून सुरुवात करून इतरांनाही नोकरी द्या. आई-वडिलांचा विरोध असला तरी त्यांना समजावून सांगा की व्यवसाय हा एक सुरक्षित आणि यशस्वी पर्याय आहे. स्वप्नं पाहण्याऐवजी ती साकार करण्यासाठी ठोस पावले उचला. आम्ही तुमच्या प्रयत्नांमध्ये मदत करण्यासाठी आम्ही सदैव उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १९१६ मध्ये एसएनडीटी महिला विद्यापीठाची स्थापना केली आणि त्यावेळी फक्त पाच विद्यार्थ्यांना घेऊन या संस्थेची सुरुवात केली. त्यांच्या दूरदृष्टीच्या स्वप्नात हे विद्यापीठ एक दिवस मोठे होईल आणि महिलांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करेल अशी कल्पना होती. आज हे विद्यापीठ खरोखरच वटवृक्षाच्या स्वरूपात वाढले आहे, ज्याच्या छायेत हजारो विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत, असे डॉ. साईनाथ बनसोडे यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा.प्रदीप रोडे यांनी संस्था आणि महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसह सर्वांगीण प्रगती संदर्भात माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरवातीला कुलगुरूंनी महाविद्यालयातील विविध विभाग आणि विद्यार्थ्यांसाठीच्या विविध सुविधांची पाहणी केली. तसेच यावेळी महाविद्यालयाद्वारे फॅशन डिझाईन प्रदर्शन भरवण्यात आले होते. ज्यामध्ये विद्यार्थिनींनी आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून प्लॅस्टिक, कागद, फेब्रिक स्क्रॅप आणि इतर पुनर्वापरयोग्य सामग्रीचा वापर करून विविध प्रकारचे ड्रेसेस आणि हॅण्डमेड ज्वेलरी डिझाईन केले होते. ते पाहून कुलगुरूंनी त्यांच्या या प्रयत्नांची प्रशंसा करून विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले. एकंदरीत नियोजन व सुविधा पाहून त्यानी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अस्मिता साळवे यांनी केले. प्रा.अश्विनी बेद्रे यांनी पाहुण्यांचा परिचय दिला, तर आभार डॉ. सारादी गोगई यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT